## निशाणी क्रमांक २३ खालील आदेश

प्रस्तुत अर्ज वादीने न्यायालयीन आयुक्त यांच्या नियुक्तीकामी दाखल केलेला आहे.

**०२.** वादीने अर्जात असे कथन केले आहे की, वादीने प्रस्तुत दावा प्रतिवादींविरुध्द मोजणी होवुन हद्दीखुणा कायम होवुन मिळणेकरीता व निरंतर ताकीद मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादी व प्रतिवादी यांचे पुर्वाधिकारी यांच्यात हद्दीचा वाद उपस्थित झाल्याने त्यांनी रे.मु.नं.८९५/२०१० हा दावा मोजणीकरीता दाखल केलेला होता. सदर दाव्यात प्रतिवादींनी मोजणीदाराशी संगणमत करुन मुळ वाटपाप्रमाणे फिल्ड न पाडता चुकीचे फिल्ड दाखवुन चुकीची मोजणी करुन अहवाल मे.कोर्टात दाखल केलेला होता. परंतु सदर मोजणी नकाशा फायनल झालेला नव्हता. सदर दाव्यातील बनावट मोजणीच्या अनुषंगाने प्रतिवादी क्रं. ४ याने मिळकतीबाबतचा बनावट खरेदीखताचा दस्त अस्तित्वात आणला आहे. तसेच प्रतिवादी क्रं.१,४,७ यांनी वादीच्या मिळकतीबाबत गैरकृत्य करुन वादी व त्याचे आई वडील व आजी यांना मारहाण केलेली आहे. वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान हद्दीबाबत वाद कायमचा संपुष्टात येणेकरीता मुळ मिळकत गट क्रं. १५५/२ ची हद्द कायम करुन मोजणी होणेकरीता तसेच अर्ज कलम १ब मध्ये वर्णन केलेल्या गट क्रं. १५५/२ च्या पोटहिश्याची मोजणी करुन तसेच अर्ज कलम २अ मध्ये वर्णन केलेले मिळकत गट क्रं. १५५/२/क/१/ब पैकी क्षेत्र ०० हे २० आर व पो.ख. ०० हे ०३ आर ची मोजणी करुन हद्दीखुणा कायम करणे आवश्यक असल्याने त्यांची मोजणी होणेकरीता मे. उपअधिक्षक भुमि अभिलेख माळशिरस यांची नेमणकु होवुन मोजणी करणेत यावी व प्रस्तुत अर्ज मंजुर करणेत यावा अशी विनंती केलेली आहे.

**०३.** प्रतिवादी क्रं. १ ते ३, ६ व ८ यांनी प्रस्तुत अर्जास निशाणी क्रं. २९ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने नाकारलेली आहेत. प्रतिवादी कथन करतात की, वादीने अर्जात नमुद केलेले दावा मिळकतीचे वर्णन व चतुःसिमा अर्धवट नमूद केलेल्या असुन त्या

सी.पी.ऑ. ७ रुल ३ ची बाधा येते. तसेच मुळ दाव्यात केलेली मागणी पाहता सदर अर्जात वादीने केलेल्या मागण्या हया अपु–या स्वरुपाच्या असून मोघम वर्णनाच्या आधारे यातील वादीस तशी मागणी करता येणार नसुन अर्जास सी.पी.सी.ऑ. ७ रुल ७ ची बाधा येते. मुळ दाव्यात कोणतेही कारण घडलेले नसल्याने विदाऊट कॉज ऑफ एक्शनचा आहे. वादी व त्याची आई यांनी प्रतिवादी क्रं. १ व २ विरुध्द रे.मु.नं.१०४२/२०१५ मध्ये तुर्तातुर्त अर्ज व कोर्ट कमिशन नेमणुकीकरीता अर्ज दिलेला होता. सदर अर्ज गुणवत्तेवर चौकशी होवुन अनुक्रमे दिनांक ०४/०१/२०१६ व ०२/०५/२०१७ रोजी नामंजुर करणेत आलेला आहे. रे.मु.नं.१०४२/२०१५ हा दुसरा दावा दाखल करणेचे अटीवर काढुन घेणेस परवानगी देण्यात यावी अशी मागणी केलेली होती. परंतु विना अट काढुन घेणेकरीता परवानगी दिलेली असुन त्याप्रमाणे तो दावा काढुन घेतलेला आहे. त्यामुळे मुळ दाव्यास सी.पी.सी.ऑ. २ रुल २ ची बाधा येते. रे.मु.नं. ८९५/२०१० कामी झालेली मोजणी कायदेशीर झालेली असुन दावा मिळकतीच्या हद्दीखुणा कायम केलेल्या आहेत. वरील सर्व कारणांचा विचार करता मुळ दावा चालणेस पात्र नसुन रद्द करणेस पात्र आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज हा चालणेस पात्र नसल्याने तो खर्चासह नामंजुर करणेत यावा अशी विनंती केलेली आहे.

**०४.** अर्ज व म्हणणे यांचे अवलोकन केले. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांचे तर्फे विधिज्ञांचे युक्तीवाद श्रवण केले. वादीच्या कथनाप्रमाणे, वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद संपुष्टात येणेकरीता मुळ गट क्रं. १५५/२ ची मोजणी होवुन हद्द कायम करुन त्याचे पोटहिस्से अर्जात कलम १ब मध्ये नमुद केल्याप्रमाणे त्यांची मोजणी होवुन हद्द कायम करुन गट क्रं. १५५/२/क/१/ब पैकी क्षेत्र ०० हे २० आर व पो.ख. ०० हे ०३ आर ची मोजणी होवुन हद्दीखुणा कायम करणे आवश्यक आहे. यापुर्वी रे.मु.नं.८९५/२०१० मध्ये केलेली मोजणी चुकीची असल्याने प्रस्तुत अर्जान्वये मोजणी होणेकरीता अर्ज मंजुर करणेत यावे अशी विनंती केलेली आहे. याउलट प्रतिवादींच्या कथनांप्रमाणे, रे.मु.नं. ८९५/२०१० मध्ये केलेली मोजणी योग्य व कायदेशीर असल्याने पुन्हा प्रस्तुत दाव्यात मोजणी करणे आवश्यक नाही. तसेच वादीने नमुद केलेल्या दावा मिळकतींचे वर्णन चुकीचे असुन त्याच्या मनाप्रमाणे त्याने चुकीचे वर्णन केलेले आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजुर करणेत

यावे अशी विनंती केलेली आहे. प्रतिवादीने निशाणी क्रं. ३१ लगत मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील ***Dinananth Supdu Joshi Vs. Shriram Shrikrushna Dautkhana & Anr., 2023(1) ALL MR 20.*** हे न्यायनिर्णय दाखल केलेले आहे. रे.मु.नं.८९५/२०१० मध्ये झालेली मोजणी ही गुणदोषावर दोंन्ही पक्षांच्या म्हणण्यानुसार न्यायायालयात शाबीत झालेली नाही व सदर दावा गुणदोषावर निर्णयित झालेला नाही. प्रतिवादीच्या कथनांनुसार प्रस्तुत दाव्यास आदेश २ रुल २ ची बाधा येते. परंतु प्रस्तुत अर्ज हा केवळ मोजणी करीता दाखल केलेला आहे. वादीच्या कथनांनुसार सदर मोजणी झाल्यास दावा गुणदोषावर निर्णयित होणे सुलभ होणार आहे. तरी प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद कायमचा संपुष्टात येण्याची शक्यता आहे. अर्जात नमुद केल्याप्रमाणे मिळकतींचे मोजणी होवुन व स्थळनिश्चिती करणे आवश्यक व गरजेचे आहे. वादीने दावा मिळकतींचे संपुर्ण वर्णन व चतुसिमा अर्जात नमुद केलेले आहे. दावा गुणदोषावर निर्णयित करणेकरीता व एकुण वस्तुस्थितीचा विचार करता न्यायालयीन आयुक्त नेमणे न्यायोचित वाटते. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

**– आदेश –**

१. प्रस्तुत अर्ज मंजूर करणेत येतो.

२. उपअधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, माळशिरस यांची न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमणुक करण्यात येते.

३. न्यायालयीन आयुक्त यांनी मौजे धर्मपुरी, ता. माळशिरस येथील मुळ मिळकत गट क्रं. १५५/२ ची हद्द कायम करुन मोजणी होणेकरीता तसेच अर्ज कलम १ब मध्ये वर्णन केलेल्या गट क्रं. १५५/२ च्या पोटहिश्याची मोजणी करुन तसेच अर्ज कलम २अ मध्ये वर्णन केलेले मिळकत गट क्रं. १५५/२/क/१/ब पैकी क्षेत्र ०० हे २० आर व पो.ख. ०० हे ०३ आर ची नियमानुसार मोजणी करुन हद्दीखुणा कायम करावी.

४. न्यायालयीन आयुक्त यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी वर नमुद मिळकतीची मोजणी करुन त्याचे चतुसिमा व स्थळनिश्चित करुन त्याचा अहवाल पुढील तारीख ३१.०७.२०२६ रोजी किंवा त्यापुर्वी पाठवावी.

५. वादीने न्यायालयीन आयुक्त यांची फी जमा करावी.

६. न्यायालयीन आयुक्त यांना नेमणुकीबाबतचे पत्र पाठविणेत यावे.

Digitally signed by AADITYA AVINASH VYAS
Date: 2026.05.08 17:52:43 +0530

दिनांक – ०८/०५/२०२६
ठिकाण – माळशिरस.

(**आदित्य अ.व्यास**)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
माळशिरस.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment/order :-

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | :- | S. T. Korbu |
| (b) | Court | :- | 2nd Jt. Civil Judge Junior Division and Judicial Magistrate First Class, Malshiras. |
| (c) | Judgment/Order signed by PO on | :- | 08/05/2026. |
| (d) | Judgment/Order uploaded on | :- | 08/05/2026. |